# घोडबंदरवरील खड्डे बुजवायचे कोणी ?

## ठाणे पालिकेने जबाबदारी झटकली ▌ सार्वजनिक बांधकाम, एमएसआरडीसी खड्डे बुजवेनात

**ठाणे** : रस्त्यांवरील पडलेले खड्डे बुजवण्यासाठी ठाणे महापालिका, सार्वजनिक बांधकाम आणि एमएसआरडीसी या तीनही यंत्रणाही एक टीम म्हणून काम करावे असे निर्देश ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले असतानाही त्यांच्या निर्देशाला पालिका प्रशासनाकडून बगल देण्यात येत आहे. घोडबंदर मार्गावरील उड्डाणपूल आणि सेवा रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असताना हे खड्डे बुजवण्याची जबाबदारी आमची नसून संबधित प्राधिकरणाने खड्डे बुजवावे, अशी भूमिका घेत ठाणे महापालिकेने जबाबदारी झटकली आहे. एमएसआरडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खड्डे बुजवले जात नसल्याने घोडबंदरच्या खड्ड्यांना वाली कोण ? असा मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे.



> ठाणे महापालिका हद्दीत एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम, एमएमआरडीए आणि स्वतः ठाणे महापालिकेचे रस्ते येतात. रस्ते कोणाचेही असले तरी, मान्सून काळात खड्डे बुजवण्याची जबाबदारी ठाणे महापालिकेची आहे.
>
> \- सौरभ राव, आयुक्त, ठा.म.पा

> ठाणे महापालिका हद्दीत खड्डे नाहीत. प्रत्येक प्राधिकरण आपापल्या क्षेत्रातील खड्डे बुजवत आहेत.
>
> \- प्रशांत सोनग्रा, शहर अभियंता, ठा.म.पा

पावसाळ्यात रस्ते खराब होऊन त्यावर पडलेले खड्डे दुरुस्त करताना कमीत कमी वेळेत प्रतिसाद दिला गेला पाहिजे. त्यासाठी महापालिकेसह सर्व यंत्रणांनी एक टीम बनून काम करावे. संसाधने, मनुष्यबळ, रस्त्याची मालकी, कामाची जबाबदारी यापैकी कोणतीही अडचण त्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. विशेष म्हणजे नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये स्वतः पालिका आयुक्त सौरभ राव यांनी रस्ते कोणाच्याही मालकीचे असले तरी मान्सून काळात हे खड्डे ठाणे महापालिका बुजवेल, असे जाहीर केले आहे. मात्र पालिका आयुक्तांच्या भूमिकेत आणि आयुक्तांच्या निर्देशांची अंमलबजावणी करणाऱ्या पालिका प्रशासनाच्या भूमिकेत तफावत असल्याचे समोर आले आहे.

गेल्या तीन ते चार दिवसांत पावसाचा जोर कायम आहे. मात्र त्यापूर्वीच घोडबंदर उड्डाणपुलावर तसेच सेवा रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे दररोज वाहतूककोंडीला सामोरे जावे लागत आहे. ही वाहतूककोंडी सोडवता सोडवता वाहतूक पोलिसांची अक्षरशः दमछाक होते. कापूरबावडी, माजिवडा या उड्डाणपुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून बघबीळ ते आनंद नगरपर्यंतच्या सेवा रस्त्यांवर देखील खड्डे पडल्याने या सरकारी यंत्रांच्या असमन्वयामुळे वाहनचालकांचे मात्र प्रचंड हाल होत आहेत.

# शहाड पुलावर वाहतूककोंडी

## पर्यायी रस्त्यांचा वापर करण्याचे वाहतूक पोलिसांचे आवाहन



**उल्हासनगर** : रविवारी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात माळशेज घाट, भीमाशंकर आदी ठिकाणी जात असतात. यामुळे शहाड उड्डाणपुलावर प्रचंड प्रमाणात वाहतूककोंडी होते. त्यामुळे नागरिकांनी व वाहनचालकांनी पर्यायी रस्त्यांचा वापर करावा, असे आवाहन उल्हासनगर वाहतूक पोलिसांनी केले आहे.

पावसाळा सुरू झाला असून नागरिक शनिवार तसेच रविवार या सुट्टीच्या दिवशी निसर्गाचा आनंद घेण्यासाठी माळशेज घाट तसेच पुण्याकडे तसेच भीमाशंकर अशा ठिकाणी फिरायला जातात. मात्र रविवारी फिरायला गेलेले लोक जेव्हा परतीला येतात. त्यावेळेस कल्याण, अंबरनाथ व बदलापूर जाण्यासाठी उल्हासनगरच्या शहाड ब्रिजजवळ संध्याकाळच्या सुमारास प्रचंड वाहतूककोंडीला सामोरे जावे लागते. यामुळे वाहनचालकांना तसेच प्रवाशांना तासनतास वाहतूककोंडीत अडकून रहावे लागते. वाहनचालकांना पर्यायी रस्ता म्हणून कल्याणला जाण्यासाठी गोवेली-टिटवाळा-आंबिवली- कल्याण या रस्त्याचा वापर करावा. अंबरनाथला जाण्यासाठी रायता पूलमार्गे तीन झाडीहून अंबरनाथ या रस्त्याचा वापर करावा तसेच बदलापूर जाण्यासाठी रायताहून दहागांव मांजर्लीमार्गे बदलापूर या रस्ताचा वापर करावा. जेणेकरून शहाड ब्रिज याठिकाणी वाहतूककोंडी होणार नाही तसेच घरी जाण्यासाठी उशीर होणार नाही, असे आवाहन उल्हासनगर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश भामरे यांनी केले आहे.

# कासारवडवलीत रिक्षाचालकावर चाकूहल्ला


**ठाणे** : ठाण्यातील कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्त्याने चालणाऱ्या रिक्षाचे चाक खड्ड्यात गेल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या बुलेटवरील दुचाकीस्वारावर पाणी उडाले. याचा राग मनात धरून रिक्षाचालक शाकीर रसुल शेख (३३) याला मारहाण केली. रिक्षाचालक प्रवासी सोडून आल्यानंतर त्याला पुन्हा गाठून त्याचावर चाकूने वार केल्याची घटना शुक्रवारी संध्याकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात आरोपी शाहबाज उर्फ नानू खानविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारदार शाकीर रसुल षेख (३३) हा रिक्षाचालक असून घटनेच्या दिवशी शुक्रवारी ठाणे स्टेशनवरून उन्नती ग्रीन्स, आनंदनगर, कासारवडवली, जी.बी.रोड, ठाणे येथे प्रवासी भाडे घेऊन निघाला असता संध्याकाळी ५-३० वाजण्याच्या सुमारास रिक्षा खड्ड्यात गेल्याने दुचाकीवरील आरोपी शाहबाज उर्फ नानू खान याच्या अंगावर रस्त्याच्या खड्ड्यातील पाणी उडाले. तेव्हा दुचाकी रिक्षा समोर उभी करून रिक्षाचालक शाकीर शेखला शाहबाज खानने मारहाण केली. त्यानंतर रिक्षाचालक भाडे सोडून पुन्हा घोडबंदर रोडवर आला असता संध्याकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास शाहबाजने त्याला अडवून त्याच्यावर चाकूने हल्ला केला आणि दुचाकीवरून पसार झाला. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात शाहबाज उर्फ नानू खानविरोधात मारहाणीचा आणि धारदार शस्त्राने वार केल्याचा गुन्हा शनिवारी दाखल करण्यात आला.

# फेज तीनमधील रिंग रोडच्या कामास मिळणार गती

**डोंबिवली** : महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार एमएमआरडीएचे अधिकारी यांनी महापालिकेचे भूसंपादन व पुनर्वसन विभागाचे उपायुक्त रमेश मिसाळ यांचे समवेत रिंग रोडच्या तिसऱ्या टप्प्यातील आरओ डब्ल्यू याकरिता लागणाऱ्या पत्री पुलाच्या भूमी अधिग्रहणाच्या कामाची पाहणी केली. १२ जुलैपासून या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

एमएमआरडीए व महापालिका अधिकारी, ठेकेदार, स्थानिक पोलीस व महापालिका पोलिसांच्या सहकार्याने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. यावेळी महापालिकेचे सहा. आयुक्त भारत पवार, एमएमआरडीएचे व महापालिकेचे सर्वेअर देखील उपस्थित होते. या कारवाईमध्ये एमएमआरडीएला पायलिंग करण्यासाठी तसेच beriketing करण्यासाठी तसेच जिओ टॅगिंग करण्यासाठी अडचण येऊ नये म्हणून संयुक्त कारवाई करण्यात आली. आता एमएमआरडीएमार्फत सदर परिसरातील जिओ टेक्निकल इन्वेस्टीगेशन व ट्री सर्व्हेच्या कामाला सुरुवात केली जाणार आहे. यामुळे रिंग रोडच्या तिसऱ्या टप्प्यातील कामास गती मिळणार आहे.



हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना कल्याण पत्रीपूल येथून माणकोली ब्रिजवरून ठाणे येथे अत्यंत कमी वेळात पोहोचता येणार आहे. पर्यायाने कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील वाहतूककोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

![सारस्वत बँक]
सारस्वत बँक
**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
(शेड्युल्ड बँक)
**वसुली विभाग** : ७४-सी, समाधान बिल्डिंग, २रा मजला, सेनापती बापट मार्ग (तुलसी पाईप रोड), दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.
**दूरध्वनी क्र.** : ८६५७०४३७१३ / १४ / १५, ८८२८८०५६०९

**ई-लिलाव विक्री सूचना**

**(लिलाव विक्री / बोली फक्त वेबसाईट https://sarfaesi.auctiontiger.net मार्फत करण्यात येईल)**

**दि सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफैसी) अ‍ॅक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६)** अंतर्गत स्थावर मालमत्तेकरिता विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना
सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार, हमीदार आणि गहाणदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनको म्हणून **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**कडे गहाण / प्रभारित आहे, जिचा **प्रत्यक्ष कब्जा सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, सदर तारण मालमत्ता **'जे आहे जेथे आहे तत्त्वाने, जे आहे जसे आहे तत्त्वाने आणि जे काही आहे तेथे आहे तत्त्वाने'** विकण्यात येणार आहे. बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खालील नमूद बाबतीत प्रभारित मालमत्तेचा ई-लिलाव **(सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफैसी) अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत)** खालील नमूद तक्त्यात नमूद अटी आणि शर्तीनुसार करण्यात येणार आहे

| अ. क्र. | कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार / गहाणवटदार | ए. सूचनेची तारीख<br>बी. कब्जाचा प्रकार / तारीख<br>सी. मागणी रक्कम | मालमत्तेचे वर्णन | I. राखीव किंमत<br>II. इ. अ. र.<br>III. बोली वाढविण्याची रक्कम | निरीक्षणाची तारीख / वेळ | इ. अ. र. व केवायसी सादर करण्याची अंतिम तारीख / वेळ | ई-लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार / गहाणदार :** श्री. सिंग आलोक लालसाहब<br>**सहकर्जदार आणि हमीदार :** सौ. सिंग प्रियांका योगेंद्र आणि श्री. सिंग लालसाहब अयोध्याप्रसाद | **०८.०३.२०२१**<br>**प्रत्यक्ष / १७.०५.२०२४**<br>**₹ ६३,५०,६९१.५० (रुपये त्रेसष्ट लाख पन्नास हजार सहाशे एक्क्याण्णव आणि पन्नास पैसे फक्त)** पुढील व्याजासह **०२.०३.२०२१** पर्यंतचे व्याज अंतर्भूत. | **श्री. सिंग आलोक लालसाहब आणि श्रीमती सिंग प्रियांका आलोक (ऊर्फ-सिंग प्रियांका योगेंद्र) आणि श्री. सिंग लालसाहब अयोध्याप्रसाद** यांच्या मालकीचा एन. जी. सनसिटीजवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१, सीटीएस क्र. ८७४-सी येथील **भूमी व्हॅली को-ऑप. हौ. सोसायटी लि.** या सोसायटीतील इमारत क्र. २ मधील पाचव्या मजल्यावरील **डी विंग, फ्लॅट क्र. ५०२, (मोजमापित अंदाजे** ५२१ चौ. फूट (बिल्ट अप क्षेत्र) | ₹ ९०.१५ लाख<br>₹ ९.०२ लाख**<br>₹ ०.५० लाख | १७.०८.२०२४<br>दु. ०३.०० ते सायं. ०५.०० वा. | २१.०८.२०२४<br>सायं. ५.०० पर्यंत | २३.०८.२०२४<br>स. ११.०० ते दु. १.०० वा. |

*** प्रदानाच्या आणि किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत उपार्जित पुढील प्रयोज्य असे व्याज, अनुषंगिक खर्च, परिव्यय, आकार इ. सहित.**
**** यशस्वी बोलीदारांनी पुढील कामाकाजा दिवसाअगोदर २५% अंतिम बोली रक्कम जमा करणे आवश्यक आहे.**
लिलाव हा बँकेचे मंजुरीत सेवा पुरवठादार **मेसर्स ई-प्रॉक्युरमेंट टेक्नॉलॉजीज् लिमिटेड (ऑक्शन टायगर)** द्वारे होईल. बोली अर्ज, सदर विक्री / लिलावाच्या अटी व शर्ती व बोली / प्रस्ताव जमा करण्याची पद्धत **https://sarfaesi.auctiontiger.net** या त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल.
इच्छुक बोलीदार / खरेदीदार यांनी इ. अ. र. **एनईएफटी /आरटीजीएस / डीडी / पे ऑर्डर** द्वारे खात्याचे नाव : **सारस्वत बँक - रिकव्हरी, आयएफएससी कोड :** एसआरसीबी००००९७, बँक नाव आणि पत्ता : **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि., वसुली विभाग,** ७४-सी, समाधान इमारत, २रा मजला, सेनापती बापट मार्ग, (तुलसी पाईप रोड), दादर, मुंबई (पश्चिम), मुंबई-४०० ०२८. **लाभार्थी खाते क्र. :** ००९७४२१४२०००००१ मध्ये हस्तांतर करावी. नोंदणीकरण, केव्हायसी दस्तावेज आणि **इ. अ. र.** हस्तांतरण हे लिलावाच्या आधी आगाऊ पूर्ण करावे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदार त्यांची बोली सादर करण्यास अयशस्वी झाल्यास वरील सेवा पुरवठादारास संपर्क करावा. **संपर्क तपशील : +९१ ९७२२७७८८२८ (कार्यालय) ०७९-६८१३ ६८५१.** इच्छुक पक्षांनी तपासणीच्या वेळी केवायसी कागदपत्रे सोबत ठेवावीत.
**प्राधिकृत अधिकारी** यांना कोणताही भार ज्ञात नाही. ज्याअर्थी इच्छुक बोलीदारांनी वरील मिळकतीसंबंधी चौकशी स्वतः करावी आणि मिळकतीवरील भाराचा रितसर शोध घ्यावा.
कोणत्याही प्राधिकरणाचे किंवा कोणाचेही सर्व सांविधानिक / असांविधानिक थकित, कर, दर असेसमेंट, प्रभार, शुल्क इ.चे प्रदान हे सर्वस्वी यशस्वी बोलीदाराची जबाबदारी आहे.
सदर प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी सदर लिलाव रद्द करू शकतात.

**सरफैकी ॲक्ट आणि रुल्स २००२ च्या नियम ८ (६) अन्वये कर्जदार / गहाणदार / हमीदार यांना ३० दिवसांची वैधानिक सूचना**
सदर सूचना ही सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ८ (५) अंतर्गत विहित्त अटी / शर्ती आणि त्यांच्या विविध सुधारणांनुसार पुढील व्याज, परिव्यय आणि खर्चासह येथील वरील नमूद थकबाकी चुकती करून त्यांची इच्छा असल्यास तारण मत्ता विमोचित करण्याच्या सल्ल्यासह वरील उल्लेखित तारीख आणि वेळ लिलाव / विक्री करण्याबाबत त्यांना कळविण्यासाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट), रुल्स २००२ च्या नियम ८ आणि ९ आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदींच्या अंतर्गत वरील कर्ज खात्याचे कर्जदार / गहाणवटदार / हमीदार यांना ३० (तीस) दिवसांची आवश्यक सूचना सुद्धा आहे. प्रदानात कसूर केल्यास तारण मत्ता प्राधिकृत अधिकारी / तारण धनकोंच्या निर्देशाने सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अंतर्गत विहित नुसार कोणत्याही माध्यमामार्फत विकण्यात येईल.

स्वाक्षरी/-
**प्राधिकृत अधिकारी**
**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
**दिनांक** : १५.०७.२०२४
**ठिकाण** : मुंबई
(टीप : स्वैर भाषांतर. तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)
Rameshwar Media

# कराडमध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्यात राडा



**कराड** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा सातारा, सांगली जिल्हास्तरीय मेळावा शनिवारी दुपारी कराड येथील वेणूताई चव्हाण सभागृहामध्ये विभागीय संपर्क नेते तथा पक्षाचे आ. भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या मेळाव्यादरम्यान सांगली जिल्ह्यातील शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या एका पदाधिकाऱ्याचा पारा चांगलाच वाढला आणि त्याने संतापाच्या भरात माजी पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या 'कानाखाली आवाज' काढतच राडा केला. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार मेळाव्याचे अध्यक्ष असलेल्या आ. भास्कर जाधव यांच्यासमोर घडल्याने याची चांगलीच चर्चा सातारा, सांगली जिल्ह्यात रात्री उशिरापर्यंत रंगली होती, तर अगोदरच शिवसेनेत उभी फूट पडत ठाकरे व शिंदे गट तयार झाले असतानाच आता ठाकरे गटातही पदाधिकारी, कार्यकर्त्यांत 'कानाखाली आवाज' काढत राडा होत असल्याने सच्च्या शिवसैनिकांतून नाराजी व्यक्त होत होती.

# जिल्ह्यातील २० बंधारे पाण्याखाली

## राधानगरी धरणातून १३०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग

**कोल्हापूर** : जिल्ह्यातील राधानगरी धरणात ४.२१ टीएमसी पाणीसाठा आहे. रविवारी सकाळी ७ च्या अहवालानुसार राधानगरी धरणातून १३०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

पंचगंगा नदीवरील-शिंगणापूर, राजाराम, सुर्वे, रुई, इचलकरंजी, तेरवाड व रुकडी, ताम्रपर्णी नदीवरील- कुर्तनवाडी, चंदगड व हल्लारवाडी, वेदगंगा नदीवरील- कुरणी, बस्तवडे व चिखली, हिरण्यकेशी नदीवरील - साळगांव, दुधगंगा नदीवरील- दत्तवाड, कासारी नदीवरील- येवलूज, पुनाळ तिरपण, ठाणे आळवे व वालोली, वारणा नदीवरील -चिंचोली असे एकूण २० बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

### जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा

राधानगरी ४.२१ टीएमसी, तुळशी १.८६ टीएमसी, वारणा १८.२३ टीएमसी, दूधगंगा ९.८८ टीएमसी, कासारी १.५० टीएमसी, कडवी १.७७ टीएमसी, कुंभी १.२२ टीएमसी, पाटगाव २.५५ टीएमसी, चिकोत्रा ०.५९ टीएमसी, चित्री १.२० टीएमसी, जंगमहट्टी १.०६ टीएमसी, घटप्रभा १.५६ टीएमसी, जांबरे ०.८२ टीएमसी, आंबेआहोळ १.०३ टीएमसी, सर्फनाला ०.२५ टीएमसी व कोदे लघु प्रकल्प ०.२१ टीएमसी इतका पाणीसाठा आहे.

### बंधाऱ्यांची पाणीपातळी

राजाराम १८.१ फूट, सुर्वे १९.६ फूट, रुई ४५.९ फूट, इचलकरंजी ४२ फूट, तेरवाड ४० फूट, शिरोळ ३१.६ फूट, नृसिंहवाडी २५ फूट, राजापूर १३.६ फूट, तर नजीकच्या सांगली ७.९ फूट व अंकली ८.५ फूट अशी आहे.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या सूचनेवरून, आम्ही **तेजल के. शाह** आणि **कौशल ए. शाह** यांच्या यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेच्या संबंधातील (**''मालमत्ता''**) अधिकार आणि हक्कविलेखांची चौकशी आणि पडताळणी करत आहोत.

त्या सर्व व्यक्तीं/संस्था तसेच अन्य गोष्टींबरोबर कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांना सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट–भाडेपट्टा, अभिहस्तांकन, वाटप, धारणाधिकार, एकाधिकार, करार, अधित्याग, अधित्यजन, वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, बक्षिस, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, भाडेदारी, पोट–भाडेदारी, संमती नि परवानगी, काळजीवाहू तत्व, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, भागिदारी, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करार, विकास व्यवस्थापन करार, हक्कविलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, गहाण, आकार, प्रतिभूती किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, शेअर आणि/किंवा मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्याच्या दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामधे ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा आमचे अशिल सदर मालमत्तेमधील असे अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/किंवा मागणी यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि/किंवा परीत्यजन करण्यात आल्याचे आणि/किंवा सोडून देण्यात आल्याचे गृहीत धरून मालमत्तेच्या प्रस्तावित खरेदीची कार्यवाही करतील आणि सदर मालमत्तेच्या संबंधातील अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट :**
**(मालमत्तेचे वर्णन)**

(१) युनिट क्र. १२०४, क्षेत्रफळ सुमारे ६२.०६ चौरस मीटर म्हणजेच अंदाजे ६६८ चौरस फूट रेरा चटईक्षेत्राच्या समतुल्य तसेच यांत्रिक/रोबोटिक पार्किंग प्रणालीमधे १ (एक) कार पार्किंगची जागा आणि (२) युनिट क्रमांक १२०५, क्षेत्रफळ सुमारे ६१.९७ चौरस मीटर म्हणजेच अंदाजे ६६७ चौरस फूट रेरा चटई क्षेत्राच्या समतुल्य तसेच यांत्रिक/रोबोटिक पार्किंग प्रणालीमधे १ (एक) कार पार्किंगची जागा, ६वा निवासी मजला, वरच्या पोडियम पातळीच्या वर, ए विंग, 'युनिकॉर्न' प्रकल्प. हा प्रकल्प दत्ताजी साळवी मार्ग, विरा देसाई रोडच्या बाजूला, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३, नोंदणी जिल्हा आणि उपजिल्हा मुंबई उपनगरातील सीटीएस क्र. ८४४/३४, ८४४/३५ आणि ८४४/३६ च्या संबंधातील ५,५०८.६० चौरस मीटर किंवा त्याच्या आसपासच्या जमिनीच्या त्या सर्व तुकड्यावर आणि भागावर बांधण्यात आलेला आहे.

आज दिनांक १५ जुलै, २०२४
करीता
LEXICON LAW PARTNERS
ADVOCATES & SOLICITORS
सही/-
भागिदार
मुल्ला हाउस, ४ था मजला,
५१, एम. जी. मार्ग, फोर्ट,
मुंबई ४००००१

**PUBLIC NOTICE**

MR. KAMLESH PRAVINCHANDRA TRIVEDI, a member of the MEENA APARTMENT Co-operative Housing Society Ltd., having address at Panchpakhadi, Thane, and holding Flat No. 204 in the building of the society, alongwith his cousin brother, MR. RAJESH RAMESHCHANDRA TRIVEDI, expired on 25.05.2024 without making any nomination.

The Society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimant or claimants *objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the Society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his claims/ objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the Society. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the Society in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society. A copy of the registered bye-laws of the Society is available for inspection by the claimants/objectors, in the office of the society/with the Secretary of the Society between 09 P.M. to 10 P.M. on last Saturday of the Month, from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place: Thane
Date: 15-07-2024

Sd/-
Hon. Secretary
For and on behalf of
The MEENA APARTMENT
Co-operative Housing Society Ltd.,

**शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.**
**नोंदणीकृत कार्यालय: 501, सालकॉन ऑरम, जसोला डिस्ट्रिक्ट सेंटर, नवी दिल्ली – 110025**
**सीआयएन: U65900DL2020PLC366027**

**लिलाव सूचना**

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि. च्या खालील कर्जदारांना याद्वारे कळविण्यात येते की बँकेकडून त्यांनी सोने कर्ज घेतले आणि बँकेद्वारे जारी केलेल्या वैयक्तीक सूचनांसह विविध मागण्या आणि सूचना पाठवूनही त्यांनी समायोजित केलेले नाही. सर्व कर्जदारांना याद्वारे कळविण्यांत येते की बँकेकडे तारण म्हणून सोने दागिण्यांचा लिलाव करण्याचे ठरवले आहे आणि त्यानुसार **29.07.2024** रोजी **दु. 03.00 वा.** हि तारीख जेथून कर्ज घेतले होते त्या शाखा परिसरात लिलावाची तारीख म्हणून निश्चित करण्यांत आली आहे. कर्जदार, खाते धारक आणि तमाम जनतेसह सर्व लिलावाच्या अटी आणि शर्तीनुसार सदर लिलावात सहभागी होऊ शकतात.

| शाखा | खाते क्र. | खाते धारकाचे नाव | वडील/पती/पत्नीचे नाव | पत्ता | खाते उघडण्याची तारीख | देणे |
|---|---|---|---|---|---|---|
| पुणे टिळक रोड | 104242510012 | प्रभाकर के ठाकुर | कुमार यांचा मुलगा | गट क्र. ७८४, बकोरी रोड, कांड नगर, वाघोली, हवेली, पुणे, महाराष्ट्र ४१२२०७ | 13/12/2023 | 287413.03 |
| माजीवाडा ठाणे | 103042514418 | मोहम्मद एफ आलम | मोहम्मद मोतीउर रहमान यांचा मुलगा | डी–३ बॅग हाऊस समसान, सदन मोहिली गाव राधे श्याम हॉटेल साकिनाका मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००७२ | 07/12/2023 | 42115.52 |
| माजीवाडा ठाणे | 103042514066 | नूर एम शेख | मोहम्मद सलिम शेख यांचा मुलगा | रुम क्र ६२, न्यू कलेक्टर कंपाऊंड प्लॉट क्र. २९, अब्दुल हमिद रोड गेट क्र ७ मोहम्मदिया रोड गेट क्र ७ मोहम्मदिया मस्जिद मालवणी मालाड पश्चिम मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००९५ | 10/11/2023 | 25921.56 |
| पुणे टिळक रोड | 104242510014 | डॉम्निक एस अवेरे | सिमॉन अवेरे यांचा मुलगा | शिवतिर्थ नगर, पुणे शहर सर्व्हे क्र. ५९/२ए, ५/एस, श्रीरंग पुणे, महाराष्ट्र ४११०१७ | 15/12/2023 | 130174.47 |
| पुणे टिळक रोड | 103042512814 | गनेश बी करनकर | बळीराम सिताराम करनकर यांचा मुलगा | क्रांती नगर एस क्र. ४८ ३ आनंद पार्क बस स्टॉप जवळ वडगाव शेरी पुणे महाराष्ट्र ४११०१४ | 05/07/2023 | 81067.18 |
| पुणे टिळक रोड | 103042512997 | गनेश बी करनकर | बळीराम सिताराम करनकर यांचा मुलगा | क्रांती नगर एस क्र. ४८ ३ आनंद पार्क बस स्टॉप जवळ वडगाव शेरी पुणे महाराष्ट्र ४११०१४ | 22/07/2023 | 257366.09 |
| पुणे टिळक रोड | 103042513184 | अनित के झा | सी/ओ निकी कुमारी | एस एन २२ १ए बी ७०३ साई श्री पिंपळे सौदागर पुणे शहर पुणे महाराष्ट्र ४११०२७ | 18/08/2023 | 23485.75 |
| पुणे टिळक रोड | 103042513735 | अनित के झा | सी/ओ निकी कुमारी | एस एन २२ १ए बी ७०३ साई श्री पिंपळे सौदागर पुणे शहर पुणे महाराष्ट्र ४११०२७ | 14/10/2023 | 42705.21 |
| माजीवाडा ठाणे | 103042513858 | करन बी सेजपाल | - | ए ६०८ गुलमोहर संघवी गार्डन मानपाडा रोड डोंबिवली पूर्व ठाणे कल्याण ठाणे महाराष्ट्र ४२१२०४ | 26/10/2023 | 87612.29 |
| माजीवाडा ठाणे | 103042513723 | करन बी सेजपाल | - | ए ६०८ गुलमोहर संघवी गार्डन मानपाडा रोड डोंबिवली पूर्व ठाणे कल्याण ठाणे महाराष्ट्र ४२१२०४ | 13/10/2023 | 79137.55 |

**लिलाव तारीख २९.०७.२०२४ @ ०३.०० दुपारी आहे**

बँकेने कोणत्याही पूर्वसूचना न देता लिलावातून कोणतेही खाते रद्द करणे किंवा लिलाव रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला.
**प्राधिकृत अधिकारी, शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.**